मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रस्ते होणार मंगळवारपासून मोकळे!

## साडे आठ लाखांचा दंड वसूल

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी ।**

शहरातील रहदारी विचारात घेऊन रस्ते विकसित करणे हे महापालिकेचे उद्दिष्ट्य आहे. पादचारी मार्ग, सायकल मार्ग, सार्वजनिक वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते, अशी सुविधा नागरिकांना उपलब्ध होतील असा प्रयत्न आहे. त्यामुळेच काही भागात स्मार्ट सिटी तर, काही भागात अर्बन स्ट्रीट स्केप डिझाईननुसार रस्ते, पदपथ, सायकल मार्ग उभारले आहेत.

त्यांसह शहरातील सर्वच पदपथांवरील अतिक्रमणे पाच सप्टेंबरपासून हटविण्याची कारवाई हाती घेतली जाणार आहे, अशी माहिती प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. अर्बन स्ट्रीट स्केप डिझाईननुसार महापालिका विविध रस्त्यांची उभारणी करीत आहे. त्यासंदर्भात चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात




आयोजित कार्यशाळेत सिंह बोलत होते. त्यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी रस्ते निर्मितीचा उद्देश स्पष्ट केला.कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, वास्तुविशारद प्रसन्न देसाई, प्रांजली देशपांडे, प्रताप भोसले, विकास ठाकर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. सिंह म्हणाले, ''अर्बन स्केपिंग डिझाईननुसार महापालिका नागरिक व मुलांसाठी शहरात ठिकठिकाणी सायकल ट्रॅक उभारत आहे. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भारतीय रस्त्यांची सध्याची परिस्थिती बघता प्रोजेक्ट दिशा प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे रहदारी कमी होण्यास मदत होणार आहे. खोराटे म्हणाले, ''रस्त्यांची रचना, रुंदी, पादचारी व सायकल मार्ग या गोष्टींचा विचार करून रस्त्यांची निर्मिती केली जात आहे. सायकल मार्ग किंवा पदपथांचा वापर होत नसेल, त्यांवर अतिक्रमण होत असतील, तर नागरिकांमध्ये जागृती करणे गरजेचे आहे.

नागरिकांनी जवळच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहनांऐवजी पादचारी मार्ग किंवा सायकल मार्गाचा वापर करावा.'' सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी प्रास्ताविक केले. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले. देसाई यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे अर्बन स्ट्रीट स्केप प्रकल्पाची माहिती दिली.

विविध शहरातील रस्त्यांची अवस्था, झाडांचे महत्त्व, पार्किंगचे विविध प्रकार आणि व्यवस्था, सुशोभीकरण आणि सुरक्षितता, रस्त्यांवरील विविध महत्त्वाचे घटक याबाबत माहिती दिली.

### वास्तुविशारद म्हणाले...

» **प्रसन्न देसाई – पूर्वीप्रमाणेच वाहनांसाठी रस्ते सोडून पादचारी व सायकल मार्ग उभारले आहेत. त्यासाठी जास्त जागा गेलेली नाही**

» **प्रांजली देशपांडे – रस्त्यांचा सर्वाधिक वापर दुचाकीस्वार व पादचारी करतात, त्यांचे प्रमाण अनुक्रमे ४६ टक्के व २३ टक्के आहे**

» **प्रताप भोसले – डाटा कलेक्शन, डिझाईन, चर्चा आणि अंमलबजावणी या चार टप्प्यांनुसार रस्त्यांची निर्मिती केली जात आहे**

» **बापूसाहेब गायकवाड (कार्यकारी अभियंता) : महापालिकेने चार बीआरटी आणि दहा रस्त्यांची**

# पवना धरणातून विसर्ग वाढवला!

## नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पवना धरण १०० टक्के भरले असून धरणातून १४०० क्यूसेक्सने विसर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पवना धरण शंभर टक्के क्षमतेने भरलेले आहे. विज निर्मिती ग्रुहद्वारे पवना नदी मध्ये पिण्यासाठी व सिंचनासाठी सकाळी



९.३० वाजता ८०० क्यूसेक्स विसर्ग करण्यात आलेला आहे. हा विसर्ग १२ वाजता वाढवून ८०० क्यूसेक्स वरून १४०० क्यूसेक्स करण्यात येणार आहे. तसेच धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण पाहता कधीही पवना धरणाच्या सांडव्यावरून पवना नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची दाट शक्यता आहे. पवना नदी काठच्या सर्व नागरीकांनी सतर्क रहावे. नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत, असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाने केले आहे.

# शाळांच्या संच मान्यतेचा मार्ग मोकळा

**पिंपरी।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची 'आधार आधारित संच मान्यता' विविध कारणांमुळे वर्षभरापासून रखडली होती. आता ती 'स्टुडंट पोर्टल'वर आवश्यक सुविधांसह उपलब्ध आहे. त्यामुळे अपूर्ण राहिलेली शाळांच्या संच मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. शाळांच्या आधार आधारित संच मान्यता करण्याची प्रशासनाची सूचना आहे. त्यानुसार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीला स्वतंत्र मान्यता मिळणार आहे. पण वर्षभरापासून बहुतांश ठिकाणी पालकांच्या वैयक्तिक अडचणी, काहींचे आधार कार्ड नसणे, वारंवार प्रयत्न करूनही इनव्हॅलिड राहणे अशा कारणांमुळे विद्यार्थी आधारित संच मान्यता झाली नाही. अशा कारणांमुळे शाळांच्या मंजूर पदांवर परिणाम होऊ नये म्हणून, ९० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी संख्या वैध धरायची आहे. अशा शाळांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या 'लॉगीन'चा वापर करून केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी केलेली नियमित विद्यार्थ्यांची पडताळणी विचारात घेतली जाणार आहे. २०२२-२३ या वर्षासाठी ३० नोव्हेंबर २०२२ रोजीची संख्या विचारात घेऊन संच मान्यता झाली आहे.

# आंदोलकांवरील गोळीबाराचा पिंपरीत निषेध!

## राज्य सरकारने महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**




जालना येथील आंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे मराठा समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराचे पडसाद रविवारी उद्योगनगरीतही उमटले. या घटनेचा निषेध करण्यासाठी शहरात रविवारी (ता. ३) आंदोलन करण्यात आले. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) व विविध संघटनांनी या घटनेच्या निषेधार्थ निदर्शने केली. या वेळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. लाठीमार घटनेच्या निषेधार्थ शिवसेनेकडून (ठाकरे गट) मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे फोटो जाळून आंदोलन करण्यात आले. 'जालना जिल्ह्यात घटलेल्या घटनेचा पिंपरी चिंचवड शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत, असे पिंपरी- चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी सांगितले. या बाबत राज्य सरकारने महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी. अन्यथा, राज्य सरकारमधील गद्दारांना पेटविण्यासाठी शिवसेनेची मशाल सज्ज आहे,' असा इशारा त्यांनी दिला. माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, शहर संघटिका अनिता तुतारे, माजी नगरसेवक संजय दुर्गुळे, विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, धनंजय आल्हाट, तुषार नवले, माजी शहर प्रमुख योगेश बाबर यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, छावा मराठा युवा महासंघ, मराठा सेवा संघ, छावा संघटना यांच्यासह मराठा समाजाच्या विविध संघटनांच्या वतीने निदर्शने केली. या वेळी आंदोलकांकडून महाराष्ट्र सरकार व पोलिसांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. 'शांततेत आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर झालेल्या अमानुष लाठीमाराचा मराठा समाज नक्कीच बदला घेईल. त्यासाठी हे आंदोलन तीव्र करणार करणार असून, येणाऱ्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे विसर्जन केल्याशिवाय मराठा समाज गप्प बसणार नाही, असा इशारा आंदोलकांकडून देण्यात आला. या घटनेनंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, जिल्हा पोलिस प्रमुखांसह जबाबदार पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करावे, आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, या घटनेची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करावी, दोषींवर कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. ॲड. लक्ष्मण रानवडे, मनोज मोरे, जीवन बोराडे, प्रकाश जाधव, काशिनाथ नखाते, सुनीता शिंदे, प्रवीण कदम, अभिमन्यू पवार, सतीश काळे, प्रवीण कदम, राजेंद्र कुंजीर, सुनीता शिंदे, रेखा देशमुख यांच्यासह अनेक

# मुख्यमंत्र्यांची प्रतिमा जाळून केला निषेध!

## सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



जालनामध्ये मराठा क्रांती मोर्चाच्या आंदोलकांवर लाठीमार केल्यानंतर अवघा महाराष्ट्र पेटून उठला आहे. ठिकठिकाणी निषेध केला जात आहे. त्याचे पडसाद आज पिंपरी-चिंचवड शहरात देखील उमटले. शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून शिंदे फडणवीस सरकारचा निषेध करत आंदोलन करण्यात आलं. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाचे चिन्ह असलेल्या मशालीने जाळण्यात आली. पोलिसांनी मध्यस्थी करत जाळण्यात येत असलेल्या प्रतिमा विझवण्याचा प्रयत्न केला. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी आक्रमक झाल्याचे बघायला मिळालं होतं. आगामी निवडणुकांमध्ये शिंदे आणि फडणवीस सरकारला याचा हिशोब द्यावा लागेल. आम्ही मराठा बांधवांच्या आणि भगिनींच्या पाठीशी आहोत असं शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांनी म्हटलं आहे. यावेळी महिला संघटिका सुलभ उबाळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. शहराध्यक्ष सचिन भोसले म्हणाले, माझ्या मराठा बांधवांवर आणि भगिनींवर या सरकारच्या माध्यमातून लाठीचार्ज करण्यात आलेला आहे. त्याचा पिंपरी- चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने तीव्र शब्दांमध्ये जाहीर निषेध करतो. महाराष्ट्रामध्ये राजकीय अंधार पडलेला आहे. महाराष्ट्रामध्ये अनाजी पंत आणि गद्दारांची भूमिका त्याचबरोबर जे गद्दार सरकार जे राज्यकर्ते यांना जाळण्याची धमक आणि ताकद ही फक्त उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षामध्ये आहे. ते आम्ही आंदोलनाच्या माध्यमातून दाखवून दिलेलं आहे. मशालिने या महाराष्ट्रमधल्या अनाजी पंताला आणि गद्दाराला जाळण्याचं काम केलेलं आहे. या देशामध्ये लोकशाही असताना आपल्या न्याय हक्कासाठी लढण्याचा अधिकार आहे. आमचा मराठा बांधव आमच्या मराठा भगिनी कायदेशीर पद्धतीने आंदोलन करत असताना ते आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न झाला. अतिशय अमानुषपणे माझ्या महिला भगिनींवर आणि माझ्या बांधवांवर अन्याय झाला त्याचा आम्ही जाहीर निषेध करतो असे म्हणाले.

### सरकारला याचा हिशोब द्यावा लागेल

**» आगामी निवडणुकांमध्ये शिंदे आणि फडणवीस सरकारला याचा हिशोब द्यावा लागेल. आम्ही मराठा बांधवांच्या आणि भगिनींच्या पाठीशी आहोत असं शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांनी म्हटलं आहे. यावेळी महिला संघटिका सुलभ उबाळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. शहराध्यक्ष सचिन भोसले म्हणाले, माझ्या मराठा बांधवांवर आणि भगिनींवर या सरकारच्या माध्यमातून लाठीचार्ज करण्यात आलेला आहे. त्याचा पिंपरी– चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने तीव्र शब्दांमध्ये जाहीर निषेध करतो. महाराष्ट्रामध्ये राजकीय अंधार पडलेला आहे.**

# सर्व घटकांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे!

## पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कुकडी कालवा समितीची बैठक

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सर्व घटकांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे. कमी पावसामुळे कुकडी प्रकल्पात सध्या कमी पाणी साठा आहे. तथापि, पिण्यासाठी पाणी सोडणे आवश्यक असून सध्याचे सुरू असलेले कुकडी डावा कालव्याचे आवर्तन दोन दिवसांनी वाढवून १० सप्टेंबरपर्यंत सुरू ठेवावे, असा निर्णय पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुकडी प्रकल्प व घोड संयुक्त प्रकल्प कालवा सल्लागार समिती बैठकीत घेण्यात आला. शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीस राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार प्रा. राम शिंदे, बबनराव पाचपुते, अतुल बेनके, अशोक पवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता (वि. प्र.) हेमंत धुमाळ, अधीक्षक अभियंता संतोष सांगळे आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, पावसाच्या मोठ्या खंडामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी पाण्याचे



योग्य नियोजन करावे. या प्रकल्पातून पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील शेती, पिण्यासाठी आणि उद्योगांना पाणी दिले जाते. पाण्याचे आवर्तन सोडताना स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात. त्यामुळे सर्व घटकांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे. विसापूर जलाशयात अतिशय कमी पाणीसाठा असून पिण्यासाठी (झींपश ) नियोजनाच्या दृष्टीने कुकडी कालव्याचे पाणी २ दिवस अधिक सुरू ठेऊन विसापूरमध्ये पाणी सोडावे. घोड प्रकल्पात सध्या केवळ २३ टक्के पाणीसाठा आहे. तथापि, पिण्यासाठी घोड धरणात आवश्यक पाणी आरक्षण ठेवून घोड धरणातून कालव्यांद्वारे सिंचनासाठी पाणी सोडणे आवश्यक असून त्याप्रमाणे पाणी सोडावे, असेही पालकमंत्री म्हणाले. यावेळी पाणी सोडण्याच्या नियोजनाबाबत महसूलमंत्री श्री. विखे पाटील आणि सहकारमंत्री श्री. वळसे पाटील यांनी तसेच उपस्थित आमदार महोदयांनी विविध सूचना केल्या. बैठकीच्या सुरवातीला कुकडी सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांनी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा व नियोजनाबाबत सादरीकरण केले.

### पाण्याची मागणी वाढली...

» पावसाच्या मोठ्या खंडामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी पाण्याचे योग्य नियोजन करावे. या प्रकल्पातून पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील शेती, पिण्यासाठी आणि उद्योगांना पाणी दिले जाते. पाण्याचे आवर्तन सोडताना स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात. त्यामुळे सर्व घटकांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे. विसापूर जलाशयात अतिशय कमी पाणीसाठा असून पिण्यासाठी नियोजनाच्या दृष्टीने कुकडी कालव्याचे पाणी २ दिवस अधिक सुरू ठेऊन विसापूरमध्ये पाणी सोडावे.

# बस वाहकाला टेम्पो चालकाकडून बेदम मारहाण!

## णे शहरात जबरी चोरीच्या चार घटना

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पीएमपीएल बस वाहकाला टेम्पो चालकाने बेदम मारहाण केल्याची घटना वारजे परिसरातील चांदणी चौकाकडे जाणार्या रस्त्यावर घडली.याप्रकरणी समाधान देवकर (वय १९ रा. अंबरनाथ, ठाणे ) याने वारजे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार टेम्पो चालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी समाधान हा पीएमपीएल बस वाहक असून १ सप्टेंबरला वारजे परिसरात जाणार्या बसमध्ये कार्यरत होता. त्यावेळी टेम्पो चालकाने बसला ओव्हरटेक केल्याने समाधानने बाहेर पाहिले. त्यामुळे रागाने पाहिल्याचा गैरसमज निर्माण झाल्याने टेम्पो चालकाने समाधानच्या डोक्यात लोखंडी स्टीलने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक एस ओलेकर पुढील तपास करीत आहेत. ऑनलाईनरित्या मोटार बुक करीत असलेल्या तरूणाच्या हातातील २५ हजारांचा मोबाइल दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेला. ही घटना २ सप्टेंबरला मध्यरात्री दोनच्या सुमारास पुणे स्टेशन परिसरात घडली आहे. याप्रकरणी सुधांशू दळवी (वय २३ रा. परेल, मुंबई )याने बंडगार्डन पोलीस




ठाण्यात तक्रार दाखल केली आहे अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुधांशू मूळचा मुंबईतील असून कामानिमित्त २ सप्टेंबरमला मध्यरात्रीच्या सुमारास पुणे रेल्वे स्टेशनवर उतरला होता. त्यानंतर रस्त्याने काही अंतर चालत आल्यानंतर अलंकार चौकाजवळ तो ऑनलाईनरित्या मोबाइलवर प्रवासासाठी मोटार बुक करीत होता. त्यावेळी दुचाकीवर आलेल्या दोघा चोरट्यांनी त्याच्याकडील २५ हजारांचा मोबाइल हिसकावून नेला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक विनय जाधव तपास करीत आहेत. प्रवासी वाहतूक गाडीचे लोकेशन मोबाईलवर पाहत असताना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी आयफोन हिसका मारून चोरून नेला. याप्रकरणी दुचाकीवर आलेल्या तीन अनोळखी आरोपींवर बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गोब्राह्मण प्रतिपालक नव्हे

» याबाबत सुधांशु सुदेश दळवी (२३, रा. परेल मुंबई) यांनी तक्रार दिली आहे.दुसर्या घटनेत कोथरूड येथील गोसावी वस्ती येथून जात असताना एका सराईताने तरूणाला रस्त्यात अडवून त्याच्या खिशातील ६०० रुपयांची रोकड जबरदस्तीने चोरून नेली. यावेळी आरोपीने तरूणाला मारहाण करून शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी सराईत रवी वाघमारे याच्यावर अलंकार पोलिस ठाण्यात अक्षय बालाजी झोंबाडे (२९, रा. हॅपी कॉलनी, गोसावी वस्ती, कोथरूड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुणे ते शिवनेरी सायकल राईड!

## ‘आग्र्याहून सुटका’ या घटनेच्या ३५६ व्या वर्षानिमित्त उपक्रम

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथून सुटका या ऐतिहासिक घटनेच्या निमित्ताने दरवर्षी इंडो अॅथलेटिक्स सोसायटीर्फे पुणे – शिवनेरी – पुणे अशा २०० किमी सायकल राईडचे आयोजन करते. यावर्षी ५७५ सायकल स्वरांनी यामध्ये सहभाग घेतला. सदर वर्ष पुणे ते शिवनेरी या राईडचे चौथे वर्ष आहे. पर्यावरण आणि आरोग्य याचा संदेश समाजामध्ये देत सदर सायकल स्वारी मार्गक्रमन करते. एका दिवसामध्ये तब्बल १०० किलोमीटर अंतर पाच ते सहा तासांमध्ये पार केले. शनिवार २ सप्टेंबर रोजी मोशी येथील गोडाऊन चौक येथून सकाळी सहा वाजता सदर सायकल राईडला झेंडा दाखवून सुरुवात झाली. यावेळी आयएएसचे अजित पाटील, गणेश भुजबळ उपस्थित होते. आग्र्याहून सुटका या ऐतिहासिक प्रसंगाला इतिहासात अतिशय महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथून १७ ऑगस्ट १६६६ साली सुटले होते. या घटनेला यावर्षी ३५६ वर्ष पूर्ण झाली. ते आग्रा येथून निघून मथुरा, प्रयागराज, वाराणसी, गया, कटक, हैदराबाद, मलखेड, विजयपूर, गोकर्ण, पन्हाळा आणि राजगड किल्ला असे तेराशे किलोमीटर अंतर तेरा दिवसांमध्ये पार करुन राजगडावर ३० ऑगस्ट रोजी पोचले होते. याच महाराजांच्या पराक्रमाला मानवंदना देण्यासाठी आम्ही दरवर्षी पुणे ते शिवनेरी राईड आयोजित करतो असे आयएएसचे सदस्य गजानन खैरे यांच्यातर्फे सांगण्यात आले.



पुणे ते शिवनेरी सायकल मार्ग :- नाशिक फाटा – राजगुरुनगर – मंचर – नारायणगाव – शिवनेरी. असा होता. अष्टविनायका मधील लेण्याद्री करून सर्व सायकलिस्ट ओझर येथे मुक्कामासाठी गेले आणि दुसऱ्या दिवशी याच मार्गावरून परतीचा प्रवास संपन्न झाला. असे आयएएस शिवनेरी सायकल राईडचे प्रमुख मदन शिंदे, दादासाहेब नखाते, प्रशांत तायडे आणि अविनाश चौगुले यांच्या तर्फे सांगण्यात आले.

### यांची होती उपस्थिती...

**» नियोजनामध्ये गिरीराज उमरीकर, अमित पवार, रमेश माने, सुशील मोरे, श्रीकांत चौधरी, मारुती विधाते, प्रतीक पवार, सुशील मोरे, श्रेयस पाटील, अजित गोरे, बाळासाहेब तांबे, काळूराम नढे, अमित पवार, अविनाश अनुशे, प्रणय कडू ,श्रीकांत चौधरी, प्रदीप टाके, प्रतीक पवार, कैलास तापकीर, प्रकाश कांबळे आर्दींनी महत्त्वाची भूमिका बजावली. राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु सायकल क्लब, नारायणगाव येथे साई संस्थान व शिवनेरी ॲथलेटिक्स असोसिएशन तर्फे स्वागत करण्यात आले. श्रीराज हॉटेल तर्फे सर्वांना मसाला दूध देण्यात आले.**

# दिवे घाटात बिबट्याचे दर्शन!

## ड्रोन कॅमेऱ्याद्वारे शोध मोहीम सुरू

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सासवड रस्त्यावरील दिवे घाटात रविवारी वाहनचालकांना बिबट्याचे दर्शन घडले. रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने धडक लागल्याने जखमी होऊन रस्त्यात पडलेल्या बिबट्याला पाहून अनेक दुचाकी चालक घाबरले होते. वन विभागाच्या रेस्क्यू टीमने दिवे घाटात धाव घेतली. तोपर्यंत बिबट्या हा घनदाट झाडीत निघून गेला. जखमी बिबट्याचा शोध वनविभागाकडून ड्रोन कॅमेराद्वारे उशिरा पर्यंत घेण्यात आला. मात्र, बिबट्या सापडला नाही.

वडकीकडून सासवडकडे जाताना दिवे घाटातील विठ्ठल मूर्तीच्या अलीकडे दुसऱ्या वळणावरती रस्त्याच्या मध्यभागी बिबट्या बसलेला होता. त्याच्या पायाला लागल्यामुळे तो काही काळ उठू शकला नाही. थोड्या वेळाने तो उठून उभा राहिला. मात्र, पायाला जखम असल्याने तो धावू शकत नव्हता. रस्त्यावरती काही काळ बिबट्या इकडून तिकडे तो चालत होता. नागरिकांच्या अवघ्या पंधरा-वीस फुटांवरती तो उभा होता. नागरिकांनी बिबट्याचे चित्रीकरण केले. दरम्यान दोन्हीकडची वाहतूक थांबल्याने वाहतूक कोंडी झाली होती. काही वेळानंतर बिबट्या घाटातील घनदाट झाडीत गेल्यावर वाहतूक सुरळीत झाली. दरम्यान, वनविभागाचे वन परिमंडळ अधिकारी मंगेश सपकाळ आणि रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. रस्त्यावर बिबट्याचे रक्त पडलेले दिसून आले. परिसरात शोध मोहीम सुरू केली. झाडी असल्याने ड्रोन कॅमेराद्वारे उशिरा शोध घेतला मात्र तो सापडला नाही.



**“ दिवे घाटात बिबट्या जखमी झाल्याची माहिती मिळताच, रेस्क्यू टीमसह आम्ही घटनास्थळी पोहचलो, मात्र, घाटातील विठ्ठल मूर्तीच्या अलीकडे दुसऱ्या वळणावरती रस्त्यावर रक्ताचे ठसे दिसून आले. त्यावरून त्याच्या पायाला मार लागला असावा. ड्रोनच्या साहायाने शोध मोहीम चालू केली आहे. जखमी बिबट्या मिळाल्यास त्याच्यावर उपचार करण्यात येतील.**

**– मंगेश सपकाळ,**
**वन परिमंडळ अधिकारी**

# सायकलसह करा पुणे मेट्रोतून प्रवास

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे मेट्रोतून प्रवासी सोबत सायकल घेऊन प्रवास करू शकतात. परंतु, एक तरुण सायकलवर बसून मेट्रो स्थानकात फिरत असल्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी महामेट्रोने सायकल घेऊन जाण्यास परवानगी असली, तरी मेट्रो स्थानकात ती चालवण्यास मनाई असल्याचा खुलासा केला आहे.पुणे मेट्रोतील सायकल प्रवासाचा हा व्हिडीओ समाज माध्यमावर टाकण्यात आला आहे. त्यात एक तरुण मेट्रो स्थानकावर सायकल घेऊन प्रवास करीत असल्याचे दिसत आहे. आधी हा तरुण सायकलवर बसून मेट्रो स्थानकावर येतो. नंतर तो मेट्रोच्या लिफ्टमध्ये जातो. मेट्रो स्थानकावर कर्मचारी त्याची तपासणी करतात. त्यानंतर हा तरुण सायकलसह मेट्रो स्थानकात प्रवेश करतो. अखेर त्याचा मेट्रोतून सायकल प्रवास सुरु होतो. यावर महामेट्रोने म्हटले आहे, की समाज माध्यमावर एक तरुण सायकल घेऊन मेट्रोतून प्रवास करतानाचा व्हिडीओ टाकण्यात आला आहे. मेट्रोमध्ये सायकल घेऊन जाण्याची मुभा पुणे मेट्रोने दिलेली आहे. मात्र मेट्रोमध्ये सायकल घेऊन जाताना सायकलवर बसुन जाणे नियमांचे उल्लंघन. सायकलचा इतर प्रवाश्यांना कोणताही अडथळा होणार नाही, याची काळजी त्या प्रवाशाने घेणे आवश्यक आहे. मेट्रो स्थानकावर आणि फलाटावर सायकल चालवणे व त्यामुळे इतर प्रवाशांना त्रास होईल असे वागणे पुणे मेट्रोच्या नियमानुसार कारवाई करण्यास पात्र असेल. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारे प्रवास करणे टाळावे.